# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण SRA/CO/002/22038

जा.क्र. झोपुप्रा/सहनिस/कार्यासन-८/ट.सो.क.४/ /सन २०१९

**सहकार कक्ष, झो.पु.प्रा., मुंबई**

दिनांक : ०७/०३/२०१९

प्रति,
रिचर्ड मोनिस (मुख्यप्रवर्तक),
(नियोजित) टेराफॉर्म द्वारका बी विंग सहकारी गृहनिर्माण संस्था,
एफ.पी. २७४ ए, न.भू.क्र. ५८०८ ऑफ व्हिलेज घाटकोपर, जवाहर रोड,
घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.

**<u>विषय : नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी नाव राखून ठेवणे व नियोजित संस्थेच्या नावाने बँक खाते उघडण्यासाठी परवानगी.</u>**

१. आपला वरील विषयाबाबतचा दिनांक १९.१२.२०१८ रोजी या प्राधिकरणाकडे सादर केलेल्या नाव आरक्षण प्रस्तावाचे अवलोकन व्हावे.

२. आपणास कळविण्यात येते की, आपले अर्जाप्रमाणे आपण सुचविलेले नांव **(नियोजित) टेराफॉर्म द्वारका बी विंग सहकारी गृहनिर्माण संस्था** हे नांव आपले नियोजित संस्थेसाठी राखून ठेवण्यात आले आहे. यापुढे संस्थेची नोंदणी होईपर्यंत या कार्यालयाशी व इतरत्र पत्रव्यवहार करताना संस्थेच्या नावापूर्वी नियोजित हा शब्द ठळक अक्षरात लिहावा. नियोजित संस्थेचा नोंदणी प्रस्ताव आवश्यक कागदपत्रासह या पत्राच्या तारखेपासून **दोन** महिन्याच्या मुदतीमध्ये या कार्यालयाकडे आपणास पाठवावा लागेल जर विहीत मुदतीत नोंदणी प्रस्ताव सादर केला नाही तर सबळ कारणास्तव मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करावा. अन्यथा मुदत संपल्यानंतर नियोजित संस्थेसाठी राखून ठेवलेले नाव रद्द केले आहे असे समजण्यात येईल व त्यासाठी कोणतेही सूचनापत्र पुन्हा पाठविण्यात येणार नाही याची कृपया आपण नोंद घ्यावी. रद्द झालेले नाव दुसऱ्या नियोजित संस्थेसाठी देता येईल.

३. नियोजित संस्थेच्या नावाने मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, घाटकोपर (पूर्व) शाखा, मुंबई या शाखेमध्ये बँक खाते उघडण्यात या पत्राद्वारे परवानगी देण्यात येत आहे. नियोजित संस्थेच्या नावाने बँक खाते दिलेल्या मुदतीमध्ये उघडावयास पाहिजे. बँक खात्यातून संस्थेची नोंदणी होईपर्यंत रक्कम हया कार्यालयाच्या लेखी परवानगी शिवाय काढता येणार नाही. संस्थेसाठी राखून ठेवलेले नाव रद्द झाल्यास नियोजित संस्थेच्या नावाने बँक खाते उघडले असल्यास बँक खाती शिल्लक असलेल्या रकमेचे या कार्यालयामध्ये प्राधिकृत अधिकाऱ्यासमोर वर्गणीदाराच्या भागाप्रमाणे त्यांना रकमेचे वाटप केले पाहिजे.

४. नियोजित संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक छापील नमुना अर्ज, नमुना पोटनियम व इतर कागदपत्रे मुंबई जिल्हा सहकारी हौसिंग फेडरेशन लि. विकास प्रिमायसेस, ११, बँक स्ट्रिट, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ येथे उपलब्ध आहेत. नोंदणी फी रुपये २,५००/- रिझर्व बँक ऑफ इंडिया, मुंबई येथे विभाग - Co-operation Department प्रधानशिर्ष- 0425 Co-operation उपप्रधान शिर्ष- 800 Other Receipt गौण शिर्ष- XIX Registration Fee संगणक संकेतांक : 04250036 या लेखा शिर्षाखाली चलनाने भरणा करावी व भरणा चलन नोंदणी प्रस्तावासोबत या कार्यालयाकडे सादर करावे.

(डॉ. स्मिता गायकवाड)
सहनिबंधक
सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे),
झो.पु.प्रा., मुंबई.

प्रत - माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
शाखा व्यवस्थापक,
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, घाटकोपर (पूर्व) शाखा मुंबई.
पत्ता : गोवर्धन कृपा, जोशी लेन, टिळक रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई- ४०० ०७७.

सहनिबंधक
सहकारी संस्था (पूर्व व पश्चिम उपनगरे),
झो.पु.प्रा., मुंबई.

प्रशासकिय इमारत, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व) मुंबई - ४०००५१
[illegible]